| CNR No. MHYA110002882011 | | | | |
|---|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | ०२ | ०५ | २०११ |
| | नोंदणी दिनांक | ०२ | ०५ | २०११ |
| | निकाल दिनांक | १४ | ०५ | २०२६ |
| | कालावधी | वर्षे | महीने | दिवस |
| | | १५ | ०० | १२ |

**भाग 'अ'**

| | | |
|---|---|---|
| | **उमरखेड येथील न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी यांचे न्यायालयात**<br>(पिठासीन न्यायाधीश एस.जी.ठाणेदार) | |
| | **नि.फौ.ख.क्र. २१००१४७/२०११**<br>**सी.एन.आर.नं. No. MHYA110002882011** | **निशाणी क्रमांक १०७** |
| | **गुन्हा नोंद क्रमांक ०१/२०११**<br>दिनांक ०८/०९/२०११ | **पोलीस ठाणे, बिटरगांव** |

| | | |
|---|---|---|
| **अभियोग पक्ष** | :- | शासन तर्फे पो.स्टे. बिटरगांव, जि. यवतमाळ |
| **विधिज्ञ** | :- | सहा. सरकारी अभियोक्ता श्री.व्ही.एस.गोरे |
| **आरोपी** | :- | ०१. राजु मल्हारी ईरनलवार,<br>वयः ३७ वर्ष, कामधंदा– मजुरी<br>०२. विशाल उत्तमराव इंगळे ,<br>वयः ३६ वर्ष, कामधंदा– मजुरी<br>रा.शाहीननगर, ता. उमरखेड, जि. यवतमाळ<br>०३. नितीन अशोकराव चापके,<br>वयः ३५ वर्ष, कामधंदा– मजुरी<br>सर्व रा.ढणकी, ता. उमरखेड, जि. यवतमाळ |
| **विधिज्ञ** | :- | श्री. एम.पी. वानखेडे |

**दोषारोपः- भारतीय दंड संहितेचे कलम ३५४, ३४१,५०६ सह ३४ अन्वये**

**भाग 'ब'**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :- | ०८/०१/२०११ |
| पहीली खबर दाखल दिनांक | :- | ०८/०१/२०११ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | :- | ०२/०५/२०११ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :- | २८/०९/२०११ |
| पुरावा सुरु झाल्याची दिनांक | :- | ३०/०४/२०१२ |
| न्यायनिर्णयासाठी निश्चित केल्याची तारीख | :- | १४/०५/२०२६ |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | :- | १४/०५/२०२६ |
| आरोपी दोषी आढळल्यास, शिक्षा ठोठावल्याचा दिनांक | :- | निर्दोष |

**आरोपीचे तपशिल :-**

| अ. क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जमानत दिनांक | दोषारोप | निर्दोष / दोषी | शिक्षा | स्थान–बध्दता कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | राजु मल्हारी ईरनलवार | ०९.०१.२०११ | ९.०१.२०११ | ३४१,३५४, ५०६, सह ३४ अन्वये | निर्दोष | नाही. | नाही. |
| २. | विशाल उत्तमराव इंगळे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | निर्दोष | नाही. | नाही. |
| ३. | नितीन अशोकराव चापके | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | निर्दोष | नाही. | नाही. |

## न्यायनिर्णय

(दिनांक १४/०५/२०२६)

आरोपीं विरुध्द भारतीय दंड विधान चे कलम ३४१,३५४,५०६ सहकलम ३४ अन्वये संपरीक्षा चालविण्यात आली.

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत अशी कीः–**

**०२.** दिनांक ०८/०१/२०११ रोजी फिर्यादी हिने बिटरगांव पोलीस स्टेशनला फिर्याद दिली की, फिर्यादी ही त्यादिवशी मजुरीला न जाता घरी होती. अंदाजे ५ वाजताचे सुमारास ती घराचे मागच्या खुल्याजागेमध्ये संडासला गेली होती. तेंव्हा हगणदरीत बसतांना झुडुपातुन आरोपी तिघे तिच्याकडे गेले. राजु ईरनलवार व विशाल इंगळे यांनी फिर्यादीच्या हाताला व पायाला पकडले व म्हणाले की, चुपचाप बस करु दे नाही तर तुला जिवाने मारील असे म्हणाले आणि नितीन हा म्हणाला की तिला इकडे घेवुन या असे म्हणाला तितक्यात फिर्यादी ओरडली तर समोरुन तिच्या भाउ आला त्याला पाहताच आरोपी पळुन गेले. वरील आरोपींनी फिर्यादीचे हात पाय धरुन छेडखानी करुन तिला जिवाने मारण्याी धमकी दिली . करिता फिर्याद दिली.

**०३.** फिर्यादीच्या तक्रारीच्या आधारे आरोपीं विरुध्द गुन्हा नोंद क्र. ०१/२०११ अन्वये भारतीय दंड विधान चे कलम ३४१,३५४,५०६ सह ३४ नुसार गुन्हा नोंदविण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास ए.पी.आय डी.ऐ देवकत्ते यांच्याकडे देण्यात आला. तपासी अंमलदारांनी सदर गुन्ह्याचा तपास पुर्ण करुन आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

**०४.** माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपीं विरुध्द निशाणी क्र. **२३** अन्वये भारतीय दंड विधान कलम ३४१, ३५४,५०६ सह ३४ अन्वये दोषारोप निश्चीत केला. सदरील आरोप आरोपींना त्यांच्या मातृभाषेत वाचून समजावून सांगण्यात आला. आरोपींनी त्यांच्यावरील आरोप नाकारले व खटला चालविण्याची मागणी केली. आरोपीं विरुध्द गुन्हयात गोवणारा पुरावा अभिलेखावर आल्याने आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वयेचे निवेदन **नि.क्र. १०३ ते १०५** वर नोंदविण्यात आले.

**०५.** दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाची पाहणी केली. खालील मुद्दे खटल्याच्या निर्णयासाठी विचारार्थ घेतले आहेत. विषद केलेल्या कारणमिमांसेन्वये मुद्येचे निष्कर्ष नमूद करण्यात आले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | दिनांक ०८.११.२०११ रोजी सायंकाळी ५.०० वाजेच्या सुमारास मौजे टेंभेश्वरनगर ढाणकी, येथे आरोपींनी समान उद्देशाने फिर्यादीची वाट अडवली व तीला पुढे जाण्यास अडविले आणि त्यायोगे भा.दं. वि. कलम **३४१** सह ३४ प्रमाणे गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिध्द केले काय? | नकारार्थी |
| ०२. | वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी समान उद्देशाने फिर्यादी हिच्यावर गुन्हेगारी बळाचा वापर केला ज्यामुळे आरोपींनी तिचा विनयभंगाचा प्रयत्न केला व फिर्यादीच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे वर्तण केले आणि त्यायोगे भा.दं. वि. कलम **३५४** सह ३४ प्रमाणे गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिध्द केले काय? | नकारार्थी |
| ०३. | वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी फिर्यादीला जिवे मारण्याची धमकी देवुन धाकदपटशा केली आणि त्यायोगे भा.दं. वि. कलम **५०६** सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिध्द केले काय? | नकारार्थी |
| ०४. | काय आदेश ? | आरोपींना निर्दोष मुक्त केले |

## कारणमिमांसा

### मुद्दे क्र. ०१ ते ०३:

**०६.** सदरचे मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्याने विवेचणांची पुनरावृत्ती टाळण्याकरीता हे मुद्दे चर्चेकरीता एकत्रीत घेण्यात आले आहेत.

**०७.** आरोपींवरील आरोप शाबित करण्यासाठी अभियोग पक्षाने एकूण तीन साक्षीदार तपासले. सा.क्र.०१ शेख अयुब शेख अहेमद, याची साक्ष **नि.क्र.२५**, सा.क्र.०२ सैयद आबीद सैयद जमीर, याची साक्ष **नि.क्र.६६**, सा.क्र.०३ सैयद अलीम सैयद जमीर, याची साक्ष **नि.क्र.६८** वर नोंदविली आहे.

**०८.** साक्षीदार क्र.०१ शेख अयुब शेख अहेमद, याच्या साक्षीत असे आले आहे की, त्याला पोलीसांनी पंच साक्षीदार म्हणुन बोलविले नव्हते. पोलीसांनी त्याची सही ढाणकी बसस्थानकामध्ये घेतली होती. घटनास्थळ पंचनामा त्याला दाखविण्यात आला. सदर साक्षीदाराने केवळ त्याची सही मान्य केली आहे. घटनास्थळ पंचनाम्यातील मजकुर त्याला माहीत नाही अशी साक्ष दिली आहे. साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करत नसल्याने त्याला उलटतपासणीच्या स्वरुपात उत्तर सुचक प्रश्न अभियोग पक्षाद्वारे विचारण्यात आले परंतु त्याद्वारे काहीही निष्पन्न झाले नाही.

**०९.** सा.क्र. ०२ सैयद अबीद सैयद जमीर, याच्या साक्षीत असे आले आहे की, तो आरोपींना ओळखतो. ते एकाच गावात राहतात. फिर्यादी ही त्याच्या काकाची मुलगी आहे. दिनांक ०८.०१.२०११ रोजी फिर्यादीच्या राहत्या घराचे समोर खुल्या जागेवर घटना घडली. फिर्यादी ही शौचासाठी गेली होती. अचानक आरोपीं हे तिच्या जवळ गेले व त्यांनी तिला दाबुन धरले. ते तिला म्हणत होते की, मला करु दे. फिर्यादी ओरडु लागली. फिर्यादीचा लहान भाऊ नामे सैयद राशीद हा तेथे गेला. त्यामुळे आरोपी तेथे पळुन गेले. फिर्यादी ही तिच्या आईसोबत त्याच्या घरी गेली व तिने त्याला सदर

घटनेबाबत सांगितले. त्यानंतर रिपोर्ट देण्यासाठी तो फिर्यादीसोबत गेला.

**१०.** सा.क्र. ०३ सैयद अलीम सैयद जमीर, याच्या साक्षीत असे आले आहे की, तो आरोपींना ओळखतो. ते एकाच गावात राहतात. फिर्यादी ही त्याची बहीण आहे. दिनांक ०८.०१.२०११ रोजी टेंभेश्वर नगर येथील खुल्याजागेवर घटना घडली. फिर्यादी ही शौचासाठी गेली होती. त्यावेळी आरोपी हे झुडुपामधुन गेले व त्यांनी फिर्यादीचा हात पकडला व तिला म्हणाले, करु दे नाही तर तुला जिवे मारुन टाकतो. फिर्यादी ओरडु लागली. फिर्यादीचा भाऊ हा तेथे गेला. त्यामुळे आरोपी तेथुन पळुन गेले. फिर्यादी, तिचा भाउ व तिची आई हे तिघे त्याच्या पानटपरीवर गेले. फिर्यादीने रडुन त्याला सदर घटना सांगितली. त्यानंतर ते पोलीस चौकी येथे गेले. तेथुन ते बिटरगांव पोलीस ठाणे येथे गेले. पोलीसांनी त्याचे बयाण घेतले. पोलीसांनी फिर्यादीचे बयाण देखील घेतले होते.

**११**. अभियोग पक्षास वेळोवेळी संधी देवुन सुध्दा फिर्यादीला तपासले नाही. सदर प्रकरणातील फिर्यादी ही अत्यंत महत्वाची साक्षीदार आहे. कथीत घटना कशी घडली व मारहाण शिवीगाळ इत्यादी आरोप सिध्द करण्यासाठी सदर साक्षीदाराची साक्ष महत्वाची ठरते. तसेच कलम ३५४ प्रमाणे एखादा गुन्हा सिध्द करण्यासाठी पिडीत महिलेला तपासणे आवश्यक होते. परंतु अभियोग पक्षाने फिर्यादीला सुध्दा तपासलेले नाही. तसेच प्रस्तुत प्रकरणात तपासण्यात आलेले साक्षदार क्र. २ सय्यद आबीद हा फिर्यादीचा चुलत भाउ आहे. सदर साक्षीदाराने प्रत्यक्ष घटना पाहिलेली नाही. कथीत घटना त्याला फिर्यादीने सांगितली होती व तो फिर्यादी सोबत फिर्याद देण्यासाठी पोलीसा ठाण्यात गेला होता अशी साक्ष त्याने दिली आहे. सदर साक्षीदार हियरसे साक्षीदार असून, त्याच्या साक्षीला फारसे महत्व देता येणार नाही.

**१२**. त्याचप्रमाणे साक्षदार क्र. ३ हा फिर्यादीचा भाउ आहे. त्याच्या साक्षीचे

अवलोकन केले असता, त्यांनी त्याच्या साक्षीत असे सांगितले आहे की, घटना फिर्यादी व तीची आई यांनी सदर साक्षीदाराच्या पानटपरीवर येवून त्याला सांगितली होती. घटना स्थळावर फिर्यादीचा दुसरा भाउ राशीद सय्यद आला होता अशी साक्ष सदर साक्षीदाराने दिली आहे. प्रस्तुत साक्षीदार सुद्ध प्रथमदर्शनी साक्षदार नसून त्याला घटना फिर्यादीने सांगितलेली आहे. प्रथमदर्शनी साक्षीदार राशीद सय्यद कथीत घटनास्थळावर आला असल्याचे अभियोग पक्षाचे कथन आहे. परंतू सदर साक्षीदाराला अभियोग पक्षाने तपासलेले नाही. प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षाने फिर्यादी किंवा इतर स्वतंत्र साक्षीदार, तपासीक अधिकारी यांना तपासलेले नाही. प्रस्तुत घटना भारतीय पुरावा कायदयाचे कलम १०६ प्रमाणे विशेषतः फिर्यादीच्याच ज्ञानात होती. फिर्यादीपेक्षा चांगली घटना किंवा साक्ष इतर कोणीही देवू शकले नसते. फिर्यादी व प्रत्यक्षदर्शनी साक्षीदारांना तपासण्यात आलेले नाही म्हणून भारतीय पुरावा कायदयाचे कलम ११४ उदाहरण (जी.) अन्वये अभियोग पक्षाविरुद्ध निष्कर्ष काढता येते. अभियोग पक्षाच्या कथनास दुजोरा देण्यासाठी कोणतेही साक्षदार तपासण्यात आलेले नाही. एकंदरीत सदरची घटना झाली किंवा नाही याबद्दल संशय निर्माण होत आहे. करिता आरोपींवर लावण्यात आलेले आरोप सिध्द होण्याइतप पुरावा अभिलेखावर दाखल नाही.

**१३.** अभिलेखावरील एकंदरीत साक्षी पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसते की, आरोपींनी संगणमत करुन फिर्यादीची वाट अडवून तीचा विनयभंग केला व जीवे मारण्याची धमकी ह्या बाबी सिद्ध होवू शकल्या नाही. सर्व बाबींवरुन आरोपींवर लावण्यात आलेले आरोप सिद्ध करणारा पुरावा अथवा पुराव्यांची श्रृखंळा अथवा परिस्थितीजन्य पुरावा न्यायालयासमोर आणण्यात अभियोग पक्षास अपयश आले आहे. फिर्याद अभिलेखावर सिध्द झालेली नाही. अभियोग पक्षाद्वारे इतर साक्षीदार तपासण्यात आले नाहीत तसेच झालेला तपास देखील अभिलेखावर सिद्ध झालेला नाही. त्यामुळे आरोपीं विरुध्द ठेवण्यात आलेला दोषारोप सिध्द होत नाही.

**१४.** अभियोग पक्षाने आरोपीं विरुध्द कोणताही बळकटी व दुजोरा देणारा संयुक्तिक व सबळ असा पुरावा अभिलेखावर आणला नसल्याने आरोपींना संशयाचा फायदा देवुन निर्दोष मुक्त करणे न्यायोचित होईल. एकंदरीत मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवुन मुद्दा क्र. ४ करीता खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

०१. आरोपी क्र.०१. राजु मल्हारी ईरनलवार, ०२. विशाल उत्तमराव इंगले आणि ०३. नितीन अशोकराव चापके यांना फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड विधान कलम ३४१, ३५४, ५०६ या गुन्ह्यातून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

०३. आरोपीचे बंधपत्र व जामीन कदबा रद्द करण्यात येत आहे.

०४. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ च्या तरतुदी अन्वये आरोपीने रक्कम रुपये १५,०००/– (प्रत्येकी पंधरा हजार रुपये मात्र) चे जामिन कदबा व स्वीय्य बंधपत्र सादर करावे.

(निकाल खुल्या न्यायालयात टंकलिखीत करुन जाहीर करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
THANEDAR SHAHABUDDIN GHOUSEMOHIUDDIN
2026.05.14 12:56:57 +0530

उमरखेड (**एस.जी.ठाणेदार**)

दिनांकः १४/०५/२०२६ २ रे न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरखेड

## भाग 'क'

अभियोग पक्षाने/बचाव पक्षाने/ न्यायालयाने नोंदविलेल्या साक्षीदारांची यादी:-

**अ) अभियोग पक्ष :-**

| अ.क्र. | साक्षीदारांचे नांव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र.१ | शेख आयुब शेख अहेमद | पंच साक्षीदार |
| सा.क्र.२ | सय्यद आरीफ सय्यद जमीर | साक्षीदार |
| सा.क्र.३ | सैय्यद अलीम सैय्यद जमीर | साक्षीदार |

**ब) आरोपी पक्षाचे साक्षीदार-**

| अ.क्र. | साक्षीदारांचे नांव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र.१ | -- | -- |

**क) न्यायालयाचे साक्षीदार-**

| अ.क्र. | साक्षीदारांचे नांव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र.१ | -- | -- |

**अभियोग पक्षाने/ बचाव पक्षाने/ न्यायालयाने सादर केलेले निशाणी यादी :-**

| अ.क्र. | साक्षीदारांचे नांव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र.१ | -- | -- |

**अ) अभियोग पक्ष :--**

| अ.क्र. | साक्षीदारांचे नांव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र.१ | -- | -- |

**ब) बचाव पक्षः-**

| अ.क्र. | साक्षीदारांचे नांव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र.१ | -- | -- |

**क) न्यायालय :--**

| अ.क्र. | साक्षीदारांचे नांव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र.१ | -- | -- |

**सादर केलेला मुद्देमाल/वस्तु :--**

| अ.क्र. | मुद्देमाल वस्तु | वर्णन |
|---|---|---|
| ०१ | -- | -- |

THANEDAR
SHAHABUDDIN
GHOUSEMOHIUDDIN
2026.05.14 12:57:04
+0530

उमरखेड (**एस.जी.ठाणेदार**)

दिनांकः १४ /०५/२०२६ २ रे न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरखेड

**दाखला**

दाखला देण्यात येतो की, सदर पी.डी.एफ.फाईलमध्ये मजकूर हा मुळ न्यायनिर्णयाप्रमाणेच आहे.

| | | |
|---|---|---|
| न्यायनिर्णय जाहीर केल्याची तारीख | : | १४.०५.२०२६ |
| न्यायाधीशांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : | १४.०५.२०२६ |
| लघुलेखकाचे नाव | | कु. एम.बी.सेंगर (क.लिपीक) |
| न्यायनिर्णय अपलोड करण्याची तारीख | : | १४.०५.२०२६ |